राष्ट्रीय कृषि विकास योजना या योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता पुरवणी मागणी अन्वये मंजूर केलेला निधी वितरीत करणेबाबत.
( लेखाशिर्ष २४०१ A७५३ ( राज्य हिस्सा )

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.११ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- १६ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) वि. वि, शासन परिपत्रक क्र. पुरक - २०१७ /प्र.क्र. ३३५ / अर्थ-३, दि. २९.१२.२०१७.
५) आ.वि.वि.. शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १८ सप्टेंबर, २०१७.
६) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. राकृवि- ०८१७ / प्र. क्र. ९५ /राकृवियो कक्ष.

**शासन निर्णय :-**

राज्यात केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजनेंतर्गत- राष्ट्रीय कृषि विकास योजना या उप अभियानांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता डिसेंबर, २०१७ च्या अधिवेशनात मागणी क्र. टी-५ , २४०१, पीक संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६-जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (३३) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय कृषि विकास योजना ( राज्य हिस्सा ४० %), २४०१ ओ७५३, ३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु. ५५४.३३ लाख इतका निधी पुरवणी मागणी अन्वये अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता वितरीत केलेला रु.१९६७.०० लाख इतका निधी वाचा क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या सदर निधीस समरुप राज्य हिस्सा निधी वितरीत करणे आवश्यक होते. त्यास अनुसरुन वित्त विभागाने राज्य हिस्सा निधीकरिता माहे डिसेंबर, २०१७ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीन्वये दिलेल्या मंजूरीस अधीन राहून मागणी टी-५ , २४०१, पीक संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६-जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (३३) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय कृषि विकास योजना ( राज्य हिस्सा ४० %), २४०१ ओ७५३, ३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु. ५५४.३३ लाख ( अक्षरी रुपये पाच कोटी चोपन्न लाख तेहतीस हजार फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास,

नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१,२ व ४ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१६०५५०८२२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.02.16 17:08:29 +05'30'

**( रविंद्र दि. औटे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव ( पदुम ) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग ( अर्थसंकल्प- १९ ), मंत्रालय, मुंबई.
६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
९. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.